दि. २२.०५.२०२३

# प्रेस नोट

**आरोपी तातेराव काशीनाथ जाधव, वय ४० वर्ष, पद — लिपीक, ने. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर, जि.लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी तातेराव काशीनाथ जाधव, लिपीक यांनी तक्रारदार यांना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. अंतर्गत एक लाख रूपये थेट कर्ज योजनेच्या प्रलंबित असलेल्या फाईल मंजूरी साठी मदत करून हेड ऑफीसला फाईल पाठविण्यासाठी ५०००/— रू. ची लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. १८/०५/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि.१९/०५/२०२३ व दि २२/०५/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. अंतर्गत एक लाख रूपये थेट कर्ज योजनेच्या प्रलंबित असलेल्या फाईल मंजूरी साठी मदत करून हेड ऑफीसला फाईल पाठवुन देतो या करीता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय, लातूर येथील तातेराव जाधव, लिपीक यांनी तक्रारदार यांना ५,०००/— रूपयाची लाच मागणी करून पहिला टप्पा ५००/— रू लाचेची रक्कम आता देण्यास सांगुन उर्वरीत लाचेची रक्कम काम झाल्यानंतर दया असे पंचासमक्ष सांगीतल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे आज दि. २२/०५/२०२३ रोजी तक्रारदार हे ईलोसे यांना समाज कल्याण कार्यालयाचे बाहेर जावुन भेटले असता ईलोसे तातेराव जाधव, लिपीक यांनी १२.५४ वा. सुमारास लाचेची रक्कम पहिला टप्पा ५००/— रू स्वत: पंचासमक्ष स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहात पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून ईलोसे तातेराव जाधव, लिपीक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन गांधी चौक, लातूर, जि.लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयात तपास अन्वर मुजावर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मपोकॉ/रूपाली भोसले पोकॉ/संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, चापोकॉ/माधव सोळुंके यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९३०९३४८९८४ |
| ३) | टोल फ्री | :— | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :— | ०२४८२—२४२६७४ |
| ५) | Website | :— | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :— | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :— | www.facebook.com/MaharashtraACB |
| ८) | Twitter | :— | ACBlatur |
| ९) | Instagram | :— | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :— | @anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर

Scanned with CamScanner